# अहिल्यानगर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com

जा.नं. शहर पा.पु. 983 दिनांक :- १९/०५/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहिल्यानगर महानगरपालिका.

विषय- मान्सुन पूर्व काळात अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजनेवरील विदयुत पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिकांनी दक्षता घेवून सहकार्य करणे बाबत

महोदय,

सध्यस्थितीत मान्सुन पूर्व परिस्थिती असून लवकरच पावसाळयाचे दिवस सुरू होत असल्याने यावावत आजवरचा अनुभव पाहता मान्सुन पूर्व काळात वादळी वा-यामुळे शहर पाणी पुरवठा योजने करीता विदयूत वितरण कंपनीकडून होणारा वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वीज मंडळाकडून होणारा वीज पुरवठा नैसर्गीक आपत्ती व तांत्रिक अडचणीमुळे बिघाड निर्माण होवून वीज पुरवठा अर्धा-एक तास जरी खंडीत झाला तरी मुळानगर, विळद व नागापूर येथील कार्यरत पंपीग स्टेशन येथून पाणी उपसा सुरळीत होण्यास सुमारे दोन ते तीन तासाचा अवधी लागतो. त्यामुळे अनियमीत पाणी उपसा होवून शहरातील वितरणासाठीच्या टाक्या वेळेत भरता येत नाहीत. पर्यायाने शहरास नियमीत व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वीज मंडळाच्या तांत्रिक अडचणीमुळे व सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने वादळी वा-यासह पाउस होत असल्याने अचानक वीज पुरवठा खंडीत होत आहे. व खंडीत वीज पुरवठया मुळे नियमित पाणी उपसा होणेस अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांनी पाण्याचा योग्य साठा करून, पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

असे जाहिर आवाहन स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करावे.

जल अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा उपायुक्त (कर), अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.

o/c

Scanned with OKEN Scanner